जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,ठाणे
इमेल-cpthanepro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २५.०६.२०२६**

‘ वेश्या व्यवसाय करवुन घेणाऱ्या एक महिला दलाल आरोपीस गुन्हे शाखेकडुन अटक ’

ठाणे शहराच्या **‘‘हॉटेल उडपी पॅलेस, तीसगाव नाका, पुणे लिंक रोड, कोळशेवाडी, कल्याण पुर्व, जि. ठाणे’’** या ठिकाणी एक महिला दलाल काही पिडीत व असहाय्य महिलांना फुस लावून वेश्यागमनासाठी बोलवणार आहे अशी गुप्त माहिती, गुप्त माहितीदारामार्फत ठाणे गुन्हे शाखेच्या अंतर्गत असलेल्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वपोनिरी/वैशाली गोरडे यांना मिळाली होती.

त्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर या शाखेने दिनांक २४/०६/२०२६ रोजी **‘‘हॉटेल उडपी पॅलेस, तीसगाव नाका, पुणे लिंक रोड, कोळशेवाडी, कल्याण पुर्व, जि. ठाणे’’** या ठिकाणी सापळा लावून एक महिला दलाल आरोपीस १६:४० वाजता ताब्यात घेवून लागलीच अटक करुन तीचे तावडीतून ०२ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर महिला दलाल आरोपी विरुध्द कोळशेवाडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दिनांक २५/०६/२०२६ रोजी ००:०५ वा. गुन्हा रजि.नंबर ३५३/२०२६ भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३ (१) १४३ (३) सह स्त्रिया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच ०२ पिडीत बळीत महिलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने मा.अधिक्षक, शांतीसदन, उल्हासनगर-५, जि.ठाणे येथे ठेवण्यात आले आहे.

सदर कारवाई ही श्री. अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, ठाणे तसेच श्री. विनय घोरपडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वपोनि/वैशाली गोरडे, मपोउनि/स्नेहल शिंदे, श्रेपोउपनि/एन.डी.क्षिरसागर, सपोउपनि/व्ही.आर.पाटील, पोहवा/७३९ डी.पी.महाले, पोहवा/३६६३ आर.यु.सुवारे, पोहवा/१७४५ व्ही.जी.नाईक, मपोहवा/७४२७ आर.के.भगत, मपोअं/२१७ एच.पी. थोरात, मपोअं/८१३१ पी.जी.खरात यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.